
पशुचिकित्सा

# जनावरांच्या पावसाळ्यातील आजारांकडे दुर्लक्ष नको!




डॉ. स्मिता कोल्हे
(मो.नं. ९९७०४२५३८९)
डॉ. आर.पी. कोल्हे
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ, जि. सातारा





पावसाळ्यात प्रामुख्याने घटसर्प, फऱ्या, काळपुळी, फुफ्फुसदाह यांसारखे आजार दिसून येतात. या आजारांमुळे जनावरांची उत्पादनशक्ती कमी होते, जनावरे अशक्त होतात. हे लक्षात घेऊन पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने जनावरांची आरोग्य तपासणी करून वेळेवर उपचार करून घ्यावेत. जनावरे आणि गोठ्याची स्वच्छता ठेवल्याने रोगप्रसारावर नियंत्रण ठेवता येते.

पावसाळ्यामध्ये पाळीव जनावरांना होणाऱ्या रोगांची माहिती या लेखाद्वारे घेऊ.

## घटसर्प

गळाघोटू किंवा परपड या नावाने हा आजार ओळखला जातो. गाय, म्हैस, शेळी, लहान वासरे इत्यादी सर्व वयोगटांतील जनावरांमध्ये या आजाराचा प्रादुर्भाव होऊ शकतो. इतर जनावरांपेक्षा म्हैसवर्गीय प्राण्यांत हा आजार अतितीव्र स्वरुपात आढळतो.

**रोगप्रसार** : या रोगाचे जंतू जमिनीत, जनावरांच्या श्वसनसंस्थेमध्ये आढळतात. रोगी जनावरांच्या नाकातून, तोंडातून येणाऱ्या स्त्रावाने संपर्कात आलेल्या चारा, पाणी व दूषित पाण्यानेसुद्धा हा रोग पसरतो.

**लक्षणे** : सडकून ताप (१०६ ते १०७ डिग्री) येतो, जनावर थरथर कापते.

* घशाखाली व गळ्यावर सूज येते (सूज येण्याअगोदर बाधित जनावर श्वसन करताना घरघर आवाज येतो)

* डोळे लाल होतात, श्वासोच्छ्वासाचा वेग वाढतो. श्वास घेण्यास त्रास होतो, जनावरे जीभ बाहेर काढतात.

* नाका-तोंडातून स्त्राव येतो, जनावरे जमिनीवर पडून राहतात.

**औषधोपचार** : आजारी जनावराला तीव्र स्वरुपात किंवा काही वेळेस अतितीव्र स्वरुपात हा आजार होतो. यामुळे हा आजार होऊ नये म्हणून अगोदरच लसीकरण करून प्रतिबंध करणे संयुक्तिक ठरते. लक्षणे दिसताच लगेच पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा.

**प्रतिबंधात्मक उपाय** : पावसाळ्याच्या प्रारंभी पहिल्या पंधरवड्यात सर्व जनावरांना घटसर्परोधक प्रतिबंधक लस टोचून घ्यावी.

## फऱ्या

हा रोग एकटांग्या, धावऱ्या किंवा घाट्या या नावाने ओळखला जातो. हा संसर्गजन्य रोग असून गाय, म्हैस, बैल, शेळी, मेंढी इत्यादी जनावरांना होतो. सहा महिने ते तीन वर्षे वयोगटातील शरीराने धष्टपुष्ट असलेल्या जनावरांत सर्वाधिक आढळतो.

**रोगप्रसार** : क्लॉस्ट्रिडिअम चोवाई या जिवाणूने बाधित चारा तसेच पाणी व मातीमार्फत या रोगाचा प्रसार होतो. जनावरांना होणाऱ्या लहानसहान जखमा, तोंडातील व जिभेवरील व्रण यांतून याचे जिवाणू जनावरांच्या शरीरात प्रवेश करतात. शरीरातील मांसल भागात (उदा. मांडी) काही काळ ते सुप्तावस्थेत राहतात. अनुकूल वातावरण मिळताच जिवाणूंची संख्या वाढते. त्यानंतर जनावरांमध्ये रोगाची लक्षणे दिसू लागतात.

**लक्षणे** : सडकून ताप (१०६ ते १०८ डिग्री) येतो, जनावर सुस्त पडते.

* श्वासोच्छ्वासाचा वेग वाढतो, श्वास घेण्यास त्रास होतो.

* जनावरांचा मांसल भाग उदा. मांडी (फरा), मानेवर जास्त प्रमाणात सूज येते. या सुजेवर दाबले असता करकर असा आवाज येतो.

सूज आलेल्या पायाने जनावर लंगडते, सूज आलेला भाग सुरुवातीच्या अवस्थेत अतिशय गरम व वेदनादायी असतो, त्यानंतर तो भाग थंड व वेदनारहित होतो. जनावर जमिनीवर पडून राहते आणि १२ ते ४८ तासांत दगावते.

**औषधोपचार** : आजारपणाची लक्षणे दिसताच ताबडतोब पशुवैद्यकाकडून उपचार करावेत.

**प्रतिबंधात्मक उपाय** : पावसाळ्यापूर्वी किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात फऱ्या रोगप्रतिबंधात्मक लसीकरण करावे.

## सर्रा

हा आजार सर्वसाधारणपणे पावसाळ्यात सर्वात जास्त आढळतो.

**रोगप्रसार** : टॅबानस नावाच्या चावणाऱ्या माश्या हा आजार पसरवितात.

**लक्षणे :** अचानक ताप येतो, जनावर गोल गोल फिरते.

* अडखळत चालते, झाडावर, भिंतीवर डोके आपटते.

* झटके देते व त्यानंतर मृत्युमुखी पडते.

**उपचार** : या आजाराची लक्षणे इतर जीवघेण्या आजारांशी मिळतीजुळती असल्याने तज्ञ पशुवैद्यकाकडूनच या आजाराची खात्री करून ताबडतोब उपचार अवलंबल्याने आजार पूर्णपणे बरा होतो.

**प्रतिबंध** : चावणाऱ्या माश्या याच हा आजार पसरवण्यामागचे मुख्य कारण असल्याने त्यांचे निर्मूलन करावे. गोठा तसेच परिसरात स्वच्छता व कोरडेपणा ठेवावा. सतत हा आजार आढळणाऱ्या भागात किंवा गावात प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.

## तिवा

हा आजार विषाणूंमुळे होतो. मुख्यत्वेकरून गायी, म्हशी बाधित होतात.

**लक्षणे** : जनावरांना तीन दिवस कालावधीचा सडकून ताप आणणारा हा आजार विषाणुजन्य असून, चावणाऱ्या माश्या पसरवितात. जनावरास सडकून ताप येतो, जनावर काळवंडते, थरथरते, सुस्त होते. एका पायाने लंगडते, ताठरते, मान, छाती, पाठ व पायांचे स्नायू आकुंचन पावतात.

**प्रतिबंध** : हा आजार माश्या व डासांमुळे पसरत असल्यामुळे डासांचे व माश्यांचे निर्मूलन करावे. गोठा व गोठ्याचा परिसर स्वच्छ व कोरडा ठेवावा. या आजारामुळे जनावरांचा मृत्यू जरी होत नसला, तरी तीन दिवसांच्या आजारपणामुळे जनावर खंगते. यामुळे जनावरांवर त्वरित पशुवैद्यकाच्या सल्ल्याने उपचार करून घ्यावेत.

### लाळ्या खुरकूत रोग

लाळ्या खुरकूत हा रोग संसर्गजन्य आहे. हा आजार विषाणुमुळे होतो. आजारी जनावराच्या संपर्कात निरोगी जनावर आल्यामुळे हा आजार होतो. तसेच दूषित खाद्य, पाणी तसेच हवेद्वारे आणि इतरही प्रसारक माध्यमांद्वारे हा रोग होऊ शकतो.

**लक्षणे :** जनावरांचे खाणे पिणे बंद होते.

* जनावरांस ताप येतो. दूध उत्पादनात घट होते.

* जनावराच्या जिभेवर, टाळूवर व तोंडाच्या आतील भागात खुरांच्या आतील त्वचेवर फोड येतात. जनावराच्या तोंडातून चिकट तारेसारखी लाळ गळते.

### प्रतिबंधात्मक उपाय

* साथीच्या काळात रोगी जनावरे कुरणात चरण्यासाठी जाऊ देऊ नयेत. रोगाचा प्रसार लाळेतून होत असल्याने रोगी जनावरांनी खाल्लेला चारा इतर जनावरांना खाऊ देऊ नये. * रोगी जनावरे निरोगी जनावरांपासून वेगळी करावीत व त्यांच्यावर पशुवैद्यकाच्या सल्ल्याने औषधोपचार करावा. आजारी जनावरांना वेगळ्या ठिकाणी पाणी पाजावे. * रोगी जनावरे बांधण्याची जागा रोज किमान एकदा जंतुनाशकाने धुवावी. जनावरांचे दूध काढण्याची भांडी, धुण्याच्या सोड्याने गरम पाण्याने धुवून घ्यावीत, म्हणजे त्यांचे निर्जंतुकीकरण होईल व रोगप्रसार टळेल.

* सर्व जनावरांना योग्य वेळी लसीकरण केल्यास हा रोग होत नाही.

### फुफ्फुसदाह (न्युमोनिया)

हा जिवाणू, विषाणू, बुरशी व अस्वच्छता इत्यादी विविध कारणांमुळे होणारा आजार असून सर्वच प्राणिवर्ग– गाय, म्हैस, शेळी, मेंढी, घोडा, गाढव, वराह इत्यादींना होतो.

**लक्षणे** : जनावरांना थंडी वाजून ताप येतो, श्वासोच्छ्वासाचा वेग वाढतो.

* श्वास घेताना घरघर आवाज येतो, जनावरांना खोकला येतो.

* सुरुवातीच्या अवस्थेत नाकपुड्यांतून पाण्यासारखा स्राव येतो, त्यानंतरच्या अवस्थेत (जुनाट न्युमोनिया) पांढरा, पिवळा किंवा हिरव्या रंगाचा स्राव येतो. डोळ्यांतून पाणी वाहते, डोळे निस्तेज व मलूल बनतात.

**औषधोपचार** : शिफारशीतील प्रतिजैविकांचा वापर तज्ज्ञ पशुवैद्यकाच्या सल्ल्याने सतत पाच ते सात दिवस केल्यास जनावरे पूर्णपणे ठणठणीत बरी होतात.

**प्रतिबंधात्मक उपाय** : जनावरांचा गोठा स्वच्छ व कोरडा ठेवावा. आजारी जनावरांना इतर निरोगी जनावरांपासून वेगळे बांधावे, जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी झूल पांघरावी.

### काळपुळी (अँथ्रॅक्स)

बॅसिलस अँथ्रॅसिस नावाच्या जिवाणूमुळे होणारा हा रोग शेळी, मेंढी, गाय, बैल, म्हैस, घोडा व पक्षी इत्यादी सर्व वयोगटांच्या जनावरांना होऊ शकतो. या आजारास फाशी, काळपुळी इत्यादी नावांनी ओळखले जाते. हा संसर्गजन्य रोग आहे.

**रोगप्रसार** : अँथ्रॅक्सचे जिवाणू जमिनीत व संसर्गित चारा– पाण्यामध्ये आढळतात. श्वासाद्वारे व चावणाऱ्या माश्यांमुळे सुद्धा हा आजार पसरतो.

**लक्षणे :** अचानक ताप (१०४ ते १०८ डिग्री) येतो. जनावरे चारा– पाणी वर्ज्य करतात. सुस्त होतात.

* जनावरांचे पोट फुगते, दुधातून रक्त येते, जनावर झटके देते. * अतितीव्र स्वरुपाच्या आजारात जनावर अचानक मृत्युमुखी पडते आणि मेलेल्या जनावराच्या तोंडातून, गुदद्वारातून, नाकातून, कानातून काळसर रंगाचे रक्त येते. हे रक्त गोठत नाही.

**उपचार** : आजारपणाच्या सुरुवातीच्या अवस्थेत जनावरे औषधोपचाराला चांगला प्रतिसाद देतात, यासाठी तज्ज्ञ पशुवैद्यकाच्या मदतीने तातडीने उपचार करावेत.

**प्रतिबंध** : ज्या भागात अँथ्रॅक्स आजाराने मृत्युमुखी पडलेल्या जनावरांची माहिती ऐकिवात आहे, त्या भागात दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला जनावरांना प्रतिबंधात्मक लस टोचून घ्यावी.

■